जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ६११ दिनांक - ०९/०८/२०२३**

**पी.सी.बी.गुन्हे शाखा पुणे शहर**

**चंदननगर पोलीस ठाणे पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या, अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए. कायद्यान्वये ३७ वी स्थानबध्दतेची कारवाई**

पुणे पोलीस आयुक्तालयातील चंदननगर पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **वैभव शैलेश गायकवाड उर्फ कुणाल गौतम कावरे,वय-२३ वर्ष,रा.गायरान वस्ती,केशवनगर मुंढवा,पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने त्याच्या साथीदारांसह **चंदननगर, विमानतळ, शिवाजीनगर** पोलीस स्टेशनच्या हद्दीत **लोखंडी रॉड, सत्तुर, कोयता** या सारख्या जीवघेण्या घातक हत्यारांसह **गंभीर दुखापतीसह दरोडा, जबरी चोरी, घातक शस्त्राने गंभीर दुखापत करणे, घातक शस्त्राने दुखापत करणे, दंगा, बेकायदेशीर हत्यार बाळगणे** यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. **मागील ०५ वर्षामध्ये त्याचेविरूध्द ०६ गुन्हे दाखल आहेत.** त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए.कायद्यान्वये नागपूर मध्यवर्ती कारागृह, नागपूर येथे ०१ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.** नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये श्री.राजेंद्र लांडगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे व श्री.राजु बहिरट,पोलीस उप-निरीक्षक,पी.सी.बी.गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी दहशत निर्माण करणा-या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी कार्यभार स्विकारल्यानंतरची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेची ही ३७ वी कारवाई असून,** यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.